क ल न - ४
दस्त क्र. ९८५० /२०२२
२२/३५

कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

कल्याण डोंबिवली महानगरपालिका
जि. ठाणे

सुधारीत व वाढीव बांधकाम मंजूरी
(ह.वि.ह. क्षेत्र:– ३०५० चौ.मी. )

जा.क्र.कडोंमपा/नरवि/बांप/डोंवि/ ९०२-७६२
कल्याण डोंबिवली महानगरपालिका,कल्याण
दिनांक:– ८-१-०८

श्री./श्रीमती :– गणाबाई पो.म्हात्रे व इतर.
कुलमुखत्यारपत्रक :– श्री. दिनेश एस्.मेहता. ( मे.शंखलेशा रिअल इस्टेट )
वास्तुशिल्पकार:– श्री. राजन चंद्रकांत गोडक, डोंबिवली ( पुर्व )

क. ल. न. - ५
दस्त क्र. ५३२५ | २०१४
८२

विषय:–स.नं. ३४२,१८७,३४३,३४० जुना, नवीन ७९,८२,८४,८६,
हि.नं. १०ब १२,३,५,६,७,८,९,१०,११ व १५,६ ७ व ८,१ प्लॉट क्र.१
मौजे– शिवाजीनगर,कुंभारखान पाडा,डोंवि.(प.)येथे बांधकाम करण्याबाबत.

संदर्भ:– १) आपला दि. १६–०७–०७ चेजीचा श्री. राजन चंद्रकांत गोडक, डोंवि.( पुर्व )
वास्तुशिल्पकार, यांचे मार्फत सादर केलेला अर्ज
२) अंतरिम मंजुरी आदेशपत्र क्र. कडोंमपा/नरवि/बांप/डोंवि/१८७–६१
दि. २९–०६–२००५

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ व ६९ अन्वये स.नं. ३४२,१८७,३४३,३४० जुना, नवीन ७९,८२,८४,८६, हि.नं. १०ब १२,३,५,६,७,८,९,१०, ११ व १५, ६, ७ व ८, १ प्लॉट क्र. १ मौजे– शिवाजीनगर,कुंभारखान पाडा, डोंबिवली (प.) मध्ये २३८५०.०० चौ.मी. भुखंडाचा विकास करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम २५३ अन्वये बांधकाम करण्यासाठी केलेल्या दि. १६–०७–२००७ च्या अर्जास अनुसरुन पुढील शर्तीस अधिन राहून तुमच्या मालकीच्या जागेत हिरव्या रंगाने दुरुस्ती दाखविल्याप्रमाणे मागील पानावर नमुद केल्याप्रमाणे, रहाणेसाठी, दुकाने, सोसायटी ऑफीस, वाडे–भिंतीच्या इमारतीच्या बांधकामाबाबत, बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात येत आहे.इमारतीच्या व जागेच्या मालकी हक्कासंदर्भात कुठलाही वाद निर्माण झाल्यास त्याला सर्वस्वी आपण जबाबदार रहाल या अटीवर हे संमतीपत्र देण्यात येत आहे.

१) हे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र दिल्याचे तारखेपासून एक वर्षापर्यंत वैध असेल, नंतर पुढील वर्षासाठी मंजूरीपत्राचे नूतनीकरण मुदत संपण्याआधी करणे आवश्यक आहे. नूतनीकरण करताना किंवा नवीन परवानगी घेताना त्यावेळी अस्तित्वात आलेल्या नियमांच्या व नियोजित विकास योजने अनुषंगाने छाननी करण्यात येईल.
२) नकाशात हिरव्या रंगाने केलेल्या दुरुस्त्या आपल्यावर बंधनकारक रहतील.
३) बांधकाम चालू करण्यापूर्वी सात दिवस आधी महापालिका कार्यालयास लेखी कळविण्यात यावे.
४) ही परवानगी आपल्या मालकीच्या कब्जातील जमीनीव्यतिरिक्त अन्य जमीनीवर बांधकाम अगर विकास करण्यास हक्क देत नाही.
५) इमारतीचे बांधकाम या सोबतच्या मंजूर केलेल्या नकाशांप्रमाणे आणि घालून दिलेल्या अटींप्रमाणे करता येईल.
६) वाडेभिंत व जोत्याचे बांधकाम झाल्यानंतर वास्तुशिल्पकाराचे, मंजूर नकाशाप्रमाणे वाडेभिंतीचे व जोत्याचे बांधकाम केल्याबाबतचे प्रमाणपत्र महानगरपालिकेस सादर करण्यात यावे, व ते या कार्यालयाकडून तपासून घेऊन "जोता पूर्णत्वाचा दाखला" देण्यात यावा व त्यानंतरच पुढील बांधकाम करण्यात यावे.
७) सदर अभिन्यासात कोणत्याही प्रकारचा फेरफार पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करु नये, तसे केल्याचे आढळून आल्यास सदरचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र रद्द झाले असे समजण्यात येईल.
.) इमारतींच्या बांधकामाच्या सुरक्षिततेची (स्ट्रक्चरल सेफटी) जबाबदारी सर्वस्वी आपले वास्तुशिल्पकार व स्थापत्य विशारद यांचेवर राहिल.
) नकाशांत दाखविलेल्या गाळ्यांच्या संख्येमध्ये व नियोजनामध्ये पूर्वपरवानगीशिवाय बदल करु नये.तसेच प्लॉटच्या हद्दीत इमारती भोवती मोकळ्या सोडावयाच्या जागेत बदल करु नये व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये.
) नागरी जमीन कमाल मर्यादा अधिनियम १९७६ मधील तरतूदी प्रमाणे जागा बाधित होत असल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपलेवर राहिल.
) भुखंडाकडे जाण्या–येण्याच्या मार्गाची जबाबदारी संपूर्णपणे आपलेकडे राहिल.बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र नियोजित रस्त्याप्रमाणे दिले असल्यास त्या रस्त्याचे काम महानगरपालिकेच्या सोयी प्रमाणे व प्राधान्याप्रमाणे केले जाईल व तसा रस्ता होईपर्यंत इमारतीकडे जाणाच्या येणाच्या मार्गाची जबाबदारी सर्वस्वी आपलेवर राहिल.
) जागेत जूने भाडेकरु असल्यास त्यांच्याबाबत योग्य ती व्यवस्था करावयाची जबाबदारी मालकाची राहिल व मालक–भाडेकरु यामध्ये काही वाद असल्यास किंवा निर्माण झाल्यास त्याचे निराकरण मालकाने करणे आवश्यक राहिल व त्याबाबतीत महानगरपालिका जबाबदार रहणार नाही.
सदर जागेत विहीर असल्यास ती संबंधित विभागाच्या परवानगी शिवाय बुजवू नये.
सदर जागेतून पाण्याचा नैसर्गिक निचरा होत असल्यास तो जलनि:सारण विभाग, (क.डों.म.पा.)च्या परवानगी शिवाय वळवू अथवा बंद करु नये.
सदर प्रकरणी चुकीची व अपुर्ण माहिती दिली असल्यास सदर बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र रद्द समजण्यात येईल.

THE SEAL OF THE JOINT SUB REGISTRAR KALYAN
सह दुय्यम निबंधक कल्याण-३
जि. ठाणे
Dist. Thane

JOINT SUB-REGISTRAR KALYAN
सह दुय्यम निबंधक कल्याण क्र.-४
जि. ठाणे
DIST. THANE